International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 5 May-June 2024

# कोळी समाजातील मुख्य गटांचा अभ्यास

**प्रा. नितीन तुकाराम जाधव**
सहा. प्राध्यापक – इतिहास विभाग, कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी
**Corresponding Author:** प्रा. नितीन तुकाराम जाधव
**Email:** ntjadhav881@gmail.com
DOI-10.5281/zenodo.12705127

**समारोप:**

कोळी ही जमात महाराष्ट्र ,गुजरात, मध्य प्रदेश इत्यादी राज्यात आढळते. विशिष्ट भागातच ती अनुसूचित जमात म्हणून मानली जाते. इतरत्र हे लोक इतर मागास प्रवर्गाच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेले दिसून येतात. सोनकोळी म्हणजे मासे मारणारे कोळी, ढोर कोळी, महादेव कोळी आणि मल्हार कोळी असे कोळ्यांचे विविध वर्ग आढळतात. महाराष्ट्रामध्ये कोळ्यांचे मुख्यत्वे दोन वर्ग पडतात. मासे मारणारे कोळी आणि शेती करणारे कोळी महाराष्ट्रात मासे मारणारे कोळी, सोनकोळी या उपजाती आढळतात. हे लोक सर्व कोळी लोकांत आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या सुधारलेले असल्याने त्यांचा अनुसूचित जमातीत समावेश होत नाही

वर्तमान अमरावती महसूल विभागात सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी आदिवासी कोळी महादेव जमात ही जमात प्रामुख्याने आढळते तसेच सह्याद्रीच्या पूर्व भागात मुळशी नदीपासून ते नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर पर्यंत जवळपास 120 मैल प्रदेशांमध्ये ही जमात वसलेली आहे पुणे-अहमदनगर खानदेश सोलापूर इत्यादी ठिकाणी प्रामुख्याने या जमातींचे वसतिस्थाने आढळतात उत्तर क्षेत्रात जव्हार भागात ही आदिवासी कोळी जमात मोठ्या प्रमाणात आज दिसून येते कालांतराने या जमातीने उदरनिर्वाहासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर स्थलांतर केले यामुळे आदिवासी कोळी जमात ही संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये दिसून येते.

**मुख्य शब्द :-** जव्हार , महादेव डोंगर , एकविरा देवी , मल्हारी भक्त , बालाघाट , पानभरे, टोकर, कोलाघा, सोनकोळी, निमाड , शिंगाडे

**प्रस्तावना :-**

निजाम कालीन वऱ्हाड प्रांतात म्हणजेच वर्तमान अमरावती महसूल विभागात सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी आदिवासी कोळी महादेव जमात ही जमात प्रामुख्याने आढळते. तसेच सह्याद्रीच्या पूर्व भागात मुळशी नदीपासून ते नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर पर्यंत जवळपास १२० मैल प्रदेशांमध्ये ही जमात वसलेली आहे. पुणे-अहमदनगर, खानदेश, सोलापूर इत्यादी ठिकाणी प्रामुख्याने या जमातींचे वसतिस्थाने आढळतात. उत्तर क्षेत्रात जव्हार भागात ही आदिवासी कोळी जमात मोठ्या प्रमाणात आज दिसून येते. कालांतराने या जमातीने उदरनिर्वाहासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये स्थानांतर केले. जव्हारचे राजे हे कोळी महादेव जमातीचे असून ते सुद्धा निजामांच्या देशातून आल्याचा उल्लेख आहे. कालांतराने या जमातीने उदरनिर्वाहासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर स्थलांतर केले. यामुळे आदिवासी कोळी जमात ही संपूर्ण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आठवण येते. परंतु सन १९५० पूर्वीच्या जनगणना आयुक्तांनी खालील नियम केल्यामुळे तसेच स्वातंत्र्यपूर्व बाहेर ठिकाणावरून आलेल्या शिक्षकांनी कर्मचाऱ्यांनी नेमकी जातीची नोंद न करता केवळ 'कोळी' या शब्दाने तसेच अशिक्षितपणामुळे व बोलण्याच्या किंवा हाक मारण्याच्या प्रघात त्यामुळे या जातीचे जमातीची नोंद फक्त कोळीच झाल्याचे दिसून येते.

वरील ठिकाणी असलेली कोळी महादेव जमात ही पूर्वेकडील निजाम राज्यातील बालाघाट किंवा महादेव डोंगर येथूनच आलेली आहे. हे खालील संदर्भावरून सिद्ध होते. पूर्वेकडील निजाम राज्यातील बालाघाट किंवा महादेवाचे डोंगर किंवा पंचमटेकडी हे आताच्या मध्य प्रदेश मध्ये आहेत. महादेव किंवा पंचमटेकडी यावरूनच कोळी महादेव या जमातीचे नाव पडले आहे .

**कोळी समाज मुख्य गट :-**

**अ) महादेव कोळी :-**

महादेव कोळी सह्याद्रीत, पुणे ते मुळशीपर्यंत व पुणे ते त्रिंबकपर्यंत आढळतात जव्हारला ही यांची वस्ती आहे. बालाघाट ऊर्फ महादेव डोंगरात त्यांचे मूळ वसतिस्थान असावे असे परंपरा सांगते. अहमदनगर जिल्ह्यातही ते आढळतात. महादेव कोळी आणि मल्हार कोळी यांपैकी पानभरे कोळी हे गडकरी होते. गड संरक्षणाचे काम ते करीत. महादेव कोळी यांचे गोत्र, नावे व कुळांची नावे अनेक आहेत. खंडोबा आणि एकवीरादेवी ही तर सर्व कोळ्यांची दैवते आहेत. परंतु महादेव कोळ्यांची वरसुबाई ही रोग बरी करणारी विशेष देवता आहे. यांच्या धर्मविषयक कल्पना सणवार आणि आचार प्रमाणेच आहेत वाघदेव, मारुती, राम, शिव, कृष्ण इत्यादी देव ते मानतात. दसरा, दिवाळी, अक्षय्यतृतीया वगैरे सण ते पाळतात आणि साजरे ही करतात कमलजादेवीलाही ते पूजतात. कळसुबाई,

गबाई ऊर्फ रानबाई वगैरेही काही मानतात. शेतात खूप गवत माजले तर ते कळस स्त्रीची प्रतिमा करून शेतात ठेवतात. विठोबाच्या माळकरी त्यांच्यात आढळतात यांचा मंत्र-तंत्र यावर फार विश्वास असतो. यांच्या समाजात भगताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कोळी पुरुष व मुलगी यांचा व्यवसाय शेती व जंगलातले पदार्थ गोळा करण्याचा असतो.

मृताला जाळतात किंवा पुरतात. मुलीचे देज देतात, प्रथम साखरपुडा होतो, लग्न मुलीच्या घरी मांडवात होते ठाकूर आणि प्रमाणे महादेव कोळयांच्या लग्नाची गाणी गाणारी धवलारीन नसते. लग्नात खूपच बारीकसारीक विधी असतात त्यांच्यात बहुपत्नीत्व रूढ आहे.

**ब) मल्हार कोळी :-**

मल्हार कोळी हे मल्हारीचे भक्त असल्यामुळे त्यांना हे नाव पडले. यांना ,पानभरे कोळी, असेही म्हणतात. हे नाव त्यांच्या पाणी भरण्याच्या कामावरून पडले असावे. हे ठाणे, मुंबई व देशावर आढळतात. यांच्यात भोईर, जाधव, केरव, पोवार, शरण, पाळ, शेलार, सोज्वळ आणि वेखंडे ही नावे आढळतात. पंढरपूरजवळ पुष्कळ मल्हार कोळी, केसकर, वेसकर म्हणून आढळतात अहमदनगर जिल्ह्यात बरेचजण शेती करतात. मराठेशाहीत सिंहगड, तोरणा व राजगड यांचे वंशपरंपरागत रक्षक, गडकरी हे मल्हार कोळीच होते. ठाणे जिल्ह्यात अनेक मल्हार कोळी कुटुंबात समाविष्ट झाले. १९६१ च्या शिरगणती प्रमाणे त्यांची लोकसंख्या एकूण ९००४७ होती

**क) टोकरे कोळी (ढोर कोळी) :-**

राज्यातील अनुसूचित जमाती मध्ये कोळी ढोर जमातीला कनिष्ठ समजले जाते. शेजारील जमातीत त्यांना अस्पृश्य समजत असत. कोळी ढोर जमातीला टोकरे कोळी कोलजा किंवा कोलघा असेही म्हटले जाते. १९८१ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या ७७४३५ इतकी होती. महाराष्ट्र राज्यात नाशिक जिल्ह्यातील पेठ व सुरगणा तालुके, ठाणे जिल्ह्यातील जव्हार व मोखाडा तालुके आणि गुजरात राज्यातील सुरत व डांग बलसाड, धरमपूर आणि बासर येथे त्यांची मुख्य वस्ती आहे .

ढोर या संज्ञेची व्युत्पत्ती एक तर ते गोमांस भक्षण करत असल्यामुळे, ढोर जनावर या शब्दापासून किंवा कन्नड वयाच्या संदर्भात मोठा या शब्दापासून झाली असावी. म्हणून त्यांना 'ढोर कोळी' असे म्हणतात. बांबू या अर्थाच्या टोकर या शब्दावरून टोकरे हे नाव त्यांना पडले असे म्हणतात. टोकरे याचा अर्थ बांबू कापणारे असा होतो. तो त्यांचा व्यवसाय असे. हे लोक जनावरे भक्षण करू लागले व त्यांनी कातकरी जमातीच्या मुलींची लग्ने केली, म्हणून त्यांना कातकरी जमातीचा दर्जा प्राप्त झाला. ढोर कोळी जमातीचा मल्हार कोळी आणि महादेव कोळी लोकसभा समूहांची कोणताही जातीय संबंध नाही. उलट पक्षी ढोरकोळी त्यांना स्वतःपेक्षा सामाजिक दृष्ट्या वरिष्ठ समजतात. कोलजा किंवा कोलघा या संज्ञा ढोर कोळी जमातीला उद्देशून वापरल्या जाणाऱ्या तुच्छतादर्शक संज्ञा आहेत. इतर जातीही या जमातीला कनिष्ठ मानतात. शारीरिक ठेवण पाहता कोळी ढोर आणि शेजारच्या जमाती या मध्ये फारसा फरक दिसून येत नाही. ते मध्यम उंचीचे अंगाने सडपातळ आणि तपकिरी वरणाचे लोक असतात त्यांचे डोळे सरळ व काळे आणि चेहरा वाटोळा असतो. हनुवटीला सामान्यतः गोलाई असते .ढोर कोळी जमातीत पुरुषप्रधान व्यवस्था आहे. बहिरविवाह संबंध करणारी त्यांची अनेक कुळे आहेत.

**ड) सोनकोळी :-** मुंबई शहर व समुद्रकिनाऱ्याच्या काही भागमध्ये ही पोटजात फार मोठ्या प्रमाणात आढळते. यांच्यात मामाच्या मुलीशी लग्न होऊ शकते, विधवा विवाहाची प्रथा आहे, सोडचिठ्ठी देतात ,डोंगर कोळयांच्या घरी सोनकोळी जेवत नाहीत. जेजुरीच्या खंडोबाची ते पूजा करतात. मृतांना जाळतात अगर पुरतात. साथीने वा रोगांनी मेलेल्या माणसाचा ते पुरतात. या जमातीच्या स्त्रिया घराची सर्व जबाबदारी सांभाळतात यांच्यात स्त्रियांना मानाचे स्थान असते.

**इ) गुजराती कोळी :-** गुजरात मधल्या कोळयांवर राजपूत संस्कार आढळतात. काही कोळी राजपूतन प्रमाणे विधवा विवाह करीत नाहीत. गुजरात मध्ये यांची संख्या १९६१ च्या जनगणनेनुसार २२४७९ होती. खेडा जिल्ह्यात कोळयांची संख्या फार आहे. पालनपुर, साबरकांठा व पंचमहाल येथे त्यांची वस्ती आहे. हे कोळी शूर, पण प्रसंगी लूटमार करणारे म्हणून ओळखले जातात. त्यांची गोत्रे स्थलपरत्वे खाली दिल्याप्रमाणे आहेत. यातील खेड्यातल्या कोळयांचे सहकार्य माळव्यात अल्या बिल यांची होते आणि ते ब्रिटिश ब्रिटिशांनाही जिंकायला भारी पडले.

**फ) मध्यप्रदेशातील कोळी :-** रसेल व हिरालाल यांनी मध्य प्रदेशातील कोळयांचे भिल्लांची अनेक बाबतीत साम्य आहे असे म्हटले आहे. हे भिल्ल म्हणजे पश्चिम सातपुड्यात असलेले खानदेशातील भिल्ल होत. विदर्भातील व खानदेशातील कोळी याच वर्गातले आहेत. भिल्लानप्रमाणे यांनाही नाईक या सन्मानार्थ नावानेच हाक मारतात. वरण-भात या कोळयांनी खिंडीचे रक्षण करण्याचे काम केलेले आहे. भिल्लांच्या प्रमाणेच कोळीही गुन्हेगार म्हणून या भागात ज्ञात होते. लोक त्यांना भीत असत. दरोडे घालने, खून करणे वगैरे प्रकारात ते पुढाकार घेत असत. निमाड जिल्ह्यात कोळयांची वस्ती पुष्कळ आहे मध्यप्रदेशात कोळयांच्या पाच जाती आहेत. सूर्यवंशी, मल्हार, शिंगाडे व मुसलमान सूर्यवंशी हे आपण राजपूत आहोत असे म्हणतात. मल्हार उर्फ पानबरी हे मल्हारीचे पुजक असून, महाराष्ट्रीय आहेत हे बिब्बे फोडण्याचा धंदा करतात.

**संदर्भ :-**

1. पुष्पलता करनकाळ ,खानदेशातील लोक देवता, गोदावरी प्रकाशन ,1997 पृष्ठ 13 ते 20
2. मांडे प्रभा, गाव गाड्या बाहेर ,परिमल प्रकाशन, औरंगाबाद ,1983 परिघाबाहेर रिसप्त संस्कृती

3. मोरवंचीकर राजश्री ,खानदेश इतिहास, जगताप संपा, ग्रंथातील प्रकरण वरळीकर रपू
4. मिराशी, वा.वी.,' संशोधन मुक्तावली,' सर 9,
5. पाटील, डी.जी, 'खान्देशचा सांस्कृतिक इतिहास' खंड 1 ,खानदेशचा भूगोल,
6. गॅझेटियर, धुळे जिल्हा
7. गॅझेटियर, नंदुरबार जिल्हा
8. गॅझेटियर, जळगाव जिल्हा
9. गॅझेटियर, नाशिक जिल्हा
10. Pargiter P.P., 'The text the Diana stick of Kohli age ,'October 1913, Pargiter P.P. historical tradition among the puranas.
11. Litagikar N.S.(ED) collected works of Bhandarkar- III,
12. Morwanchikar r.s. 'python through the age', New Delhi ,1985
13. Thapar, romila,' ancient India'